खरीप व रब्बी पणन हंगाम २०१५-१६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या धानाची जाहिर ई-लिलावाद्वारे विक्री करणेबाबत शासननिर्णय क्रमांक धानभ/१२१७/२८९/प्र.क्र.४२/नापु-२९ दिनांक १.७.२०१७ अंतर्गत **गठित समितीची सभा सोमवार दिनांक ६.११.२०१७**

## सभेचे इतिवृत्त

खरीप व रब्बी पणन हंगाम २०१५-१६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या धानापैकी एकूण ३ जिल्ह्यांमध्ये (अनुक्रमे रायगड, ठाणे व सिंधुदूर्ग) शिल्लक असलेल्या धानाची लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्याकरिता केंद्रीय पातळीवर संदर्भीय शासननिर्णयानुसार गठित करण्यात आलेल्या समितीची चौथी बैठक दिनांक ६.११.२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. समितीचे अध्यक्ष मा.नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे दालनामध्ये घेण्यात आली. बैठकीस खालील अधिकारीं हजर होते.

१. श्री.वसंत जाधवर, उपसंचालक वित्तीय सल्लागार व व उपसचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं.वि. - सदस्य सचिव
२. श्री.जयसिंग वळवी, जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे - सदस्य
३. श्री.नितीन राऊत, जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदुर्ग - सदस्य
४. श्री.स्वप्निल पिंपळे,स.ले.अ.,जि.पु.अ.रायगड यांचेवतीने - सदस्य

सर्वप्रथम आतापर्यंत झालेल्या ई-लिलाव प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. NeML NCDEX Group Company यांचेमार्फत ९.१०.२०१७ व दि.१०.१०.२०१७ रोजी राबविलेल्या ई-लिलावामध्ये एकूण ३२ पैकी ७ ठिकाणच्या धानसाठ्याबाबत आधारभूत किंमत रू.१,३००/- पेक्षा अधिक बोली येऊन सिंधुदुर्ग जिल्हयातील ७ ठिकाणची ई-लिलावाद्धारे विक्री पार पाडण्यात आली असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी स्पष्ट केले. इतर २५ ठिकाणांसाठी दिनांक २६.१०.२०१७ व दिनांक २७.१०.२०१७ रोजी पु:नश्च रू.१,३००/- इतकी आधारभूर विक्री किंमत ठेवून ई-लिलाव करण्यात आला. मात्र NeML NCDEX Group Company यांनी दिनांक २७.१०.२०१७ रोजी पाठविलेल्या ई-मेल नुसार सदर ई-लिलावामध्ये २५पैकी कोणत्याही ठिकाणी बोली प्राप्त झालेली नसल्याची वस्तुस्थिती सभेपुढे स्पष्ट करण्यात आली.

जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे व इतर सदस्यांनी असे स्पष्ट केले की, नवीन धान खरेदी शासनामार्फत सुरु करण्यात आली असून सध्या शिल्लक असलेल्या धानाची शक्य तितक्या त्वरेने विक्री करणे आवश्यक आहे, जेणेकरून नविन धानाकरिता साठवणूक जागा उपलब्ध होऊ शकेल. त्याचबरोबर त्यांचेकडून असे प्रस्तावित करण्यात आले की, सध्या बाजारातील धानाचे भाव (दर), ई-लिलावासाठी असलेल्या धानाचा साठवणूक व खरेदी कालावधी, निश्चित केलेल्या आधारभूत दरावर दोन वेळा लिलाव प्रक्रिया राबवूनसुध्दा प्रतिसाद न मिळाल्यामुळे ई-लिलावामध्ये विक्रीकरिता किमान आधारभूत किंमत प्रति क्विंटल रू.१,३००/-

करुन प्रति क्विंटल रु.१,०००/- इतकी ठेवावी व सदर कमी केलेल्या किंमतीसह दिनांक १३ व १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी NeML NCDEX Group Company तर्फे ई-लिलाव प्रक्रिया राबवावी.

सदर प्रस्तावास समितीचे अध्यक्ष मा.नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, यांचेकडून मान्यता देण्यात आली व समितीच्या सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही त्वरित अंमलात आणण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले.

यानंतर अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

क्र.निशि/दक्षता/धान/ई-लिलाव/का.क्र.५/जा. १७३
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, ५वा मजला, रॉयल इन्श्युरन्स इमारत,
१४, ज.टा.मार्ग, चर्चगेट, मुंबई.-४०० ०२०.
दूरध्वनी : ०२२ २२८२१४१९
ई-मेल : dycor.ho-mum@gov.in
दिनांक : ७/११/२०१७

प्रत : समितीचे सर्व संबंधित सदस्य, सदस्य सचिव व सभेस उपस्थित अधिकारी.
प्रत : मा.प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना माहिती करिता सविनय सादर.